स.क्रि.केस नं.८६८२/२०२३ (निशाण क्र.१४ / सी)

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.डी.ए.पाटील यांचेतर्फे सुरु,

१. माझे एफ.वाय पर्यंतचे शिक्षण झाले आहे. माझा बुलडोझरचा व्यवसाय असून मी मशिनरी भाडयाने देतो. या व्यवसायाव्यतिरिक्त उत्पन्नाचे साधन म्हणून माझेकडे शेती आहे. सन २०२२ साली माझेकडे ५-६ बुलडोझर मशिन होत्या. ते बुलडोझर मशिन चेनवरच्या आहेत. बुलडोझर मशिन भाडयाने देताना मी कधी त्याबाबत लेखी करारनामा करतो तर कधी तोंडी कराराने मशिन देतो. भाडयाने दिलेल्या बुलडोझर मशिनची मी माझेकडे नोंद करुन ठेवतो. भाडयाने दिलेल्या बुलडोझर मशिनचे बिलींग मी नियमित जतन करतो. मी भाडयाने दिलेल्या बुलडोझरचे जे बिलींग करतो त्याचे ऑडीटींग देखील करतो. मी ज्या त्या सालाचे आयकर विवरणपत्र भरतो. ज्या लोकांची येणेबाकी असेल त्या लोकांची नावे मी जत केली आहे. उधारी बाकीच्या खात्यावर सन्ड्री लेटर म्हणून नमूद करतो. सन २०२२-२३ सालात आरोपीशी जो काही व्यवहार झाला त्याबाबतचे व आयकर मी आयकर भरला आहे व ऑडीट रिपोर्ट केला आहे. आरोपीला चेकने रक्कम रुपये २० लाख रुपये दिले ही बाब माझे फिर्यादीत नमूद नाही. आरोपीला सुरुवातीला एक बुलडोझर मशिन भाडयाने दिले होते व नंतर एक छोटे मशिन भाडयाने दिले. बुलडोझर मशीन वापरण्याकरिता जर डिझेल ज्याला ते मशिन भडयाने दिले आहे त्याने भरले असल्यास ती रक्कम बुलडोझर मालकाला देणे असलेल्या भाडे रक्कमेतून वजा केली जाते. आरोपीला बुलडोझर मशीन किती तारखेला व किती कालावधीकरिता भाडयाने दिले हे मला माझे रेकॉर्ड पाहिल्याशिवाय सांगता येणार नाही. त्याबाबतचे रेकॉर्ड हजर करायला मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कधीही बुलडोझर दिलेले नव्हते.

प्रश्न ः आरोपीला तुम्ही भाडेने दिलेल्या बुलडोझर मशीन किती कालावधीकरिता वापरले व भाडे किती झाले हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे काय?

उत्तरः मी आरोपीला २० लाख रुपये दिले होते. त्याबाबत ही केस चालू आहे. आरोपीला मी बुलडोझर मशीन त्याचे चंदगड तालुक्यातील गावात वाळूच्या माईन्स येथे वापरणेकरिता दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला दिलेल्या बुलडोझर मशीन या चेनच्या असलेमुळे त्याला ट्रान्स्पोर्ट करावे लागत होते. कोणत्या ट्रान्स्पोर्ट ट्रकने बुलडोझर मशीन आरोपीच्या गावी गेले व त्याला ट्रान्स्पोर्ट खर्च किती आला हे बिल मी हजर करणेस तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या गावी बुलडोझर मशीन खाणीचे कामाकरिता पाठविले होते व या केसमधील व्यवहार त्या व्यवहाराशी संबंधित नव्हता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला जी.एस.टी.ला व आयकर ला २० लाख रुपये दाखवायचे होते म्हणून मी आरोपीकडून खोटे कागद तयार करुन आरोपीला २० लाख रुपये दिलेचे दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीने माझेकडून बुलडोझर नेवून काम केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने तथाकथीत २० लाखाच्या परतफेडीपोटी दि.०५/०७/२३ रोजी ४ लाख ९० हजार रुपये मला दिले होते, आरोपीने तथाकथीत २० लाखाच्या परतफेडीपोटी दि.०७/०७/२३ रोजी १ लाख १० हजार रुपये मला दिले होते, आरोपीने तथाकथीत २० लाखाच्या परतफेडीपोटी दि.११/०७/२३ रोजी ४ लाख ५० हजार रुपये मला दिले होते, आरोपीने तथाकथीत २० लाखाच्या परतफेडीपोटी दि.१३/०७/२३ रोजी र.रु.४ लाख रुपये मला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने असे एकून मला २० लाखाच्या परतफेडीपैकी एकूण १४ लाख ५० हजार रुपये परतफेड केली आहे. ज्या ज्या व्यक्तीकडून रक्कमा जमा झाल्या त्याचा उल्लेख आयकर विवरणपत्रात दाखविला जातो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून सिक्युरिटी म्हणून घेतलेले ४ धनादेश यांचा गैरवापर करुन व ते धनादेश भरुन आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी धनादेशात नमूद केलेली २० लाख रुपये रक्कम कधीही देणे लागत नाही. मी आरोपीचे हस्ताक्षर व सही ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, या केसमधील चारी चेक आरोपीने दिलेले नाहीत. हे म्हणणे

खरे नाही की, चारही धनादेशावर आरोपीने माझेसमक्ष सहया केलेल्या नाहीत चारही धनादेशावरील हस्ताक्षर आरोपीचे नाही किंवा कसे मला माहित नाही. चारही धनादेशावरील सहया आरोपीच्या नाही किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की मला आरोपीने चेक दिले, त्यामुळे मी काहीही सांगू शकत नाही. आरोपीने मला धनादेश कोणत्या ठिकाणी व कधी दिले हे फिर्यादीत नमूद नाही हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की, इनकम टॅक्स विभागात २० लाख रुपये रक्कम ही योग्य प्रकारे अॅडजस्ट करावयाची असलेमुळे मी आरोपीकडून सुरक्षीतता म्हणून घेतलेले चारही धनादेशांचा वापर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरफायदा व्हावा म्हणून मी चारही धनादेशांचा वापर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या केसमधील चारही धनादेश बॅंकेत वटणेकरिता गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नि.१६,१८,२० २२ हे खोटे चेक रिटर्न मेमो केसमध्ये दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या केसमधील धनादेश अनादरीत झालेनंतर मी आरोपीला नोटीस पाठविली नव्हती. मी पाठविलेली नोटीस आरोपीला मिळाली नाही किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कोणतेही देणे लागत नसताना मी आरोपीने सुरक्षीततेसाठी दिलेल्या चेकचा गैरवापर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला कर्ज रक्कम मिळावी म्हणून आरोपीला मी ऑनलाईन २० लाख रुपेये दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझी जी काही रक्कम व्यवहारापोटी देणे लागत होता ती पूर्ण परत केलेनंतर त्याच्याकडून जादा रक्कम मिळावी म्हणून मी आरोपीविरुध्द खोटी केस करुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला, फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

दि - ०२/०७/२०२६

( एन.आर.भळगट)

६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर